महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७५, ४६५, ४९२, ४४२, ४४३, ४४७
ई-मेल - desk२@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dte.maharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२५

**परिपत्रक**

विषय: शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र / फार्म डी, वास्तुशास्त्र, एचएमसीटी, बीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएम व अभिकल्प इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

संदर्भ : शासन अधिसूचना क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.४७३(भाग-३)/तांशि ४, दि. २४.०४.२०१७

या संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, शासन अनुदानित व विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र / फार्म डी, वास्तुशास्त्र, एचएमसीटी, बीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएम व अभिकल्प पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्यास संदर्भीन अधिसूचनेतील नियम क्र. १६ अन्वये तरतूद करण्यात आलेली आहे. सदर नियमाची प्रत (मराठी व इंग्रजी मधील) सोबत माहितीसाठी जोडली असून त्यामध्ये पाठ्यक्रम बदल व संस्था बदलासाठीची प्रमुख पात्रता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | विनंती | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | दुसरे वर्ष | अभियांत्रिकी पदवी पाठ्यक्रम / संस्था बदल | प्रथम व द्वितीय सत्र उत्तीर्ण किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण, पाठ्यक्रम / संस्था बदलीस विंनती केलेल्या शाखेत संबंधित संस्थेत रिक्त जागांची उपलब्धता, तसेच विद्यापीठ बदल होत असल्यास विद्यापीठाने निर्धारीत केलेली पात्रता. |
| २ | तिसरे वर्ष | संस्था बदल | प्रथम वर्ष उत्तीर्ण, द्वितीय वर्षाच्या परीक्षेमध्ये तृतीय व चतुर्थ सत्र उत्तीर्ण किंवा विद्यापीठाच्या सवलतीनुसार उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण, संस्था बदलीस विंनती केलेल्या संस्थेतील संबंधित वर्ग शाखेत रिक्त जागांची उपलब्धता व विद्यापीठ बदल होत असल्यास विद्यापीठाने निर्धारीत केलेली पात्रता |
| ३ | चौथे वर्ष | संस्था बदल | प्रथम व द्वितीय वर्ष उत्तीर्ण, तृतीय वर्षाच्या परीक्षेमध्ये पाचवे व सहावे सत्र उत्तीर्ण किंवा विद्यापीठाच्या सवलतीनुसार उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण, पाठ्यक्रम / संस्था बदलीस विंनती केलेल्या संस्थेतील संबंधित वर्ग शाखेत रिक्त जागांची उपलब्धता व विद्यापीठ बदल होत असल्यास विद्यापीठाने निर्धारीत केलेली पात्रता |

सदर संस्थामध्ये पाठ्यक्रम बदल व संस्था बदलासाठी अर्ज दि.१४.०७.२०२५ रोजी पर्यंत सादर करण्यात यावे.

Signed by
Vinod Mahadeorao Mohitkar
Date: 03-07-2025 18:01:06
( डॉ.विनोद मोहितकर )
संचालक, तंत्र शिक्षण, म. रा. मुंबई

प्रत : मा. सचिव, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग,फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी, बीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएम व अभिकल्प पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थाना अग्रेषित करून संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करण्यास कळविण्यात यावे.

२. प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र / फार्म डी, वास्तुशास्त्र, एचएमसीटी, बीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएम व अभिकल्प पदवी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करून पुढील उचित कार्यवाही कालमर्यादेत करण्यात यावी.

३. मा. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (पात्रता शाखा)

४. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई

५. कार्यासन क्रमांक २, निवड नस्तीस.